प्रथम मान्यता आदेश

क्र.सिंजिप/शिक्षण/प्राथ/यो5/मान्यता/1232/18
शिक्षण विभाग (प्राथमिक) जि.प.सिंधुदुर्ग.
सिंधुदुर्गनगरी दिनांक -14/06/2018.

प्रति,

अध्यक्ष,
पाटणकर एज्युकेशनल ट्रस्टसावंतवाडी,
ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग.

**विषय -** **सन 2018 - 19 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यीत शाळा (स्थापना व विनयमन) अधिनियम 2012 अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणेसाठी परवानगी देणे बाबत.**

**संदर्भ -** 1. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (म. शासन असाधारण 4, 6 व 24)
2.महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक एस.एफ.एस.-1018/प्र.क्र.393/एसएम-2 दिनांक 13 जुन 2018.

उपरोक्त विषयी आपणास कळविणेत येते की आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2018-19 मध्ये नविन शाळा स्थापन करणे करिता प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्या प्रस्तावानुसार संस्थेस संदर्भ क्र 02 च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणे करिता खालील अटी व शर्तीस अधीन राहुन प्रथम मान्यता प्रदान करणेत येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | नविन शाळा / दर्जावाढ | शाळा प्रकार | परवानगी वर्ष | इयत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 01 | पाटणकर एज्युकेशनल ट्रस्ट जुना शिरोडा नाका, सावंतवाडी ता.सावंतवाडी. | द स्टेपिंग स्टोन ग्लोबल स्कुल, निरुखे, ता.सावंतवाडी जि.सिंधुदुर्ग. | इंग्रजी | नवीन शाळा | प्राथमिक ते माध्यमिक ( इ.1 ली ते 10 वी) | 2019-2020 | इ. 1 ली च्या फक्त एका तुकडीस. |

Dr. Rupali Mandlik

1. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाहीत.
2. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
3. या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष 2019-20 पासुन असेल.
4. परवानगी मिळाल्यापासुन अठरा महीन्यांच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.
5. परवानगी देणेत आलेल्या नवीन शाळेस केंद्र व राज्य शासनाचे शिक्षण विषयक अधिनियम, नियम, वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे, कार्यपदधतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकारी अधिनियम 2009 मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
6. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहीती करिता स्वयंअर्थ सहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

Stepping Stone Global School

MANAGER

7. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयं अर्थसहाय्यित शाळा म्हणुन स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
9. नवीन शाळांमध्ये शासन निर्णय दिनांक 29/06/2013 नुसार भौतीक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील. प्राथमिक शाळांच्या संदर्भात RTE act 2009 मध्ये नमुद केलेल्या सर्व मानकांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.
10. अधिनियमातील तरतुदीनुसार संस्था वरील वर्ग कायम विना अनुदान तत्वावर चालविणेस कायमपणे आर्थिक दृष्ट्या सक्षम असली पाहीजे. या वर्गाना कायम विना अनुदान तत्वावर मंजुरी दिलेली असल्याने भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थीक मदत शासनकडुन देणेत येणार नाही.
11. शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहीजे.
12. शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधीन राहुन नेमला पाहीजे. तसेच सदर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते नियमानुसार संस्थेने दिले पाहीजेत.
13. संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन विषयक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे. शासन निर्णय दिनांक 29/06/2013 मध्ये दिलेल्या मुलभुत सुविधांच्या निकषांची पुर्तता करणे आवश्यक आहे.
14. संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहीजे. तसेच अभ्यासक्रम, पाठयपुस्तके, मुल्यमापन पदधती शालेय व सहशालेय / कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहीजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहीजेत.
15. संस्थेने शाळेतील विदयार्थ्यांसाठी / कर्मचाऱ्यांसाठी विहीत नोंदवहया अदयावत व विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहीजेत.
16. संस्थेने / शाळेने माध्यमिक शाळा संहिता, महराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली 1981 मधील तरतुदी तसेच शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपदधतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.
17. शासन निर्णय दिनांक 03/11/2009 नुसार व मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शाळेची इमारत नॅशनल बिल्डींग कोड नुसार असणे आवश्यक आहे.
18. शाळेने ज्या अभ्यासक्रम मंडळाशी संलग्न होण्यासाठी या अधिनियमांतर्गत परवानगी मागणी केलेली असेल त्या अभ्यासक्रम मंडळ संलग्नतेसाठी प्रचलित नियमानुसार विहीत नमुन्यात व कार्यपदधतीनुसार मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.
19. विदयार्थ्यांकडुन फी ची आकारणी करताना वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णय / शासन परिपत्रकातील सुचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग**

Dr. Rupali Mandhik

Stepping Stone Global School

**MANAGER**